# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/05/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. खापरखेडा** :—अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील चिंचोली वार्ड क्रमांक एक येथे दिनांक ०५/०५/२०२३ चे ०२/०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ अरुणा आनंद शिंदे वय ६१ वर्ष राहणार वार्ड क्रमांक तीन भानेगाव यांचे ऑफिसचे दाराचे कुलूप तोडून चोरी झाल्याचे मानसिंग बारसे रा. चिचोली याने फिर्यादीला फोन करून सांगितले फिर्यादीने येऊन पाहणी केली तेव्हा फिर्यादीचे ऑफिसचे कुलूप तुटलेले दिसले ऑफिसमध्ये ठेवलेले १) लहान जर्मनचा गंज किंमती अंदाजे १,०००/— रुपये २) वेस्टीज कंपनीचा कुकर किंमती ७००/— रुपये ३) मॅगी कंपनीचा मिक्सर किंमती अंदाजे १,५००/— रुपये व इतर लहान भांडे किंमती २००/— रुपये ४) लोखंडी सलाकी वजन १२ किलो किंमती ४००/— रुपये असा एकूण ३,८००/— रुपयाचा मुद्देमाल **आरोपी नामे— सुनील उर्फ पापा श्याम चव्हाण वय ५१ वर्ष राहणार चिंचोली वार्ड क्रमांक एक** याने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपार्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरूद्ध कलम ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोना रेवतकर ब. नं. १९८७ ९५४५५२३७३६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर